# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

## ४१२-ई, शिवाजीनगर, पुणे- ४११ ०१६.

फॅक्स २५६५६२३४ Email : ropune@dtemaharashtra.gov.in Web Site : - www.ropune.org.in

====================================================================================

जा.क्र.तंशिविकापु/विवि-१/३३ कोटी वृक्षलागवड/२०१९/A002

**अतितात्काळ :** दिनांक : 25 SEP 2019

**कालमर्यादा दि.३०.०९.२०१९**

प्रति,
संचालक / प्राचार्य,
या विभागीय कार्यालयाच्या अधिपत्याखाली
असलेल्या **पुणे/सातारा/सांगली/कोल्हापर व सोलापूर** जिल्हयातील
सर्व शासकीय/अशासकीय अनुदानित/विनाअनुदानित पदविका तसेच
व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या पदवी व पदव्युत्तर पदवी संस्था.

**विषय :- १ जुलै ते ३० सप्टेंबर २०१९ या कालावधीमध्ये ३३ कोटी वृक्षारोपण कार्यक्रमाच्या अंमलबजावणीबाबत.**

संदर्भ :-१. तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांचे पत्र क्रमांक:१६/आस्था/संकीर्ण/२०१९/२४३, दि. २४.०७.२०१९.
२. तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांचे पत्र क्रमांक:१६/आस्था/संकीर्ण/२०१९/२८२, दि. १७.०९.२०१९.
३. तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांचे पत्र क्रमांक:१६/आस्था/संकीर्ण/२०१९/२४३, दि. २४.०७.२०१९.

मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांचे उपरोक्त विषयाचे संदर्भ क्र. ३ चे पत्र या कार्यालयास प्राप्त झाले असून, सुलभ संदर्भासाठी सदर पत्राची छायांकित प्रत सोबत जोडली आहे. ३३ कोटी वृक्ष लागवड कार्यक्रमांतर्गत सन २०१९ करीता, तंत्रशिक्षण संचालनालयस दिलेल्या ३,५३,००० इतक्या उद्दिष्टाच्या अनुषंगाने, सद्यस्थितीनुसार दिनांक २४.०९.२०१९ रोजी, एकूण २,९७,८९२ (८४.३९%) एवढेच उद्दिष्ट साध्य झाले असल्याचे सदर पत्रान्वये या कार्यालयास कळविलेले आहे.

तंत्रशिक्षण संचालनालयास दिलेल्या वृक्ष लागवड उद्दिष्टाच्या अनुषंगाने, या विभागीय कार्यालयाच्या अधिपत्याखाली असलेल्या सर्व संस्थांना संस्थानिहाय उद्दिष्ट नेमून देण्यात आलेले आहे. परंतु ब-याच संस्थांनी अद्याप दिलेल्या उद्दिष्टानुसार वृक्ष लागवड केलेलीच नाही. तसेच काही संस्थांनी दिलेल्या उद्दिष्टापेक्षा कमी प्रमाणात वृक्ष लागवड करुन, सदरची माहिती **www.greenarmy.mahaforest.gov.in** या संकेतस्थळावर अपलोड केलेली नाही **ही अत्यंत गंभीर बाब आहे.**

तरी या पत्राव्दारे आपणांस पुन्हा सूचित करण्यात येते की, दिनांक ३०.०९.२०१९ पर्यंत दिलेल्या उद्दिष्टानुसार (१०० %) वृक्ष लागवड पूर्ण करुन, सदरची माहिती (फोटो व व्हिडिओसह) वरील परिच्छेदात नमूद केलेल्या संकेतस्थळावर अपलोड करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.. **वृक्षलागवड करण्याबाबत तंत्रशिक्षण संचालनालयास देण्यात आलेले उद्दिष्ट पूर्ण न झाल्यास, संबंधित संस्थांना याबाबत जबाबदार धरण्यांत येईल, याची संबंधित सर्व संस्थानी नोंद घ्यावी.**

प्र.सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.

प्रत : मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना माहितीसाठी सविनय सादर.

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.

PH:264 1150, 264 1151, 2620601, 2690602, 2621726(D) FAX:2692102

Telegram:Edutech E-Mail: desk16@dtemaharashtra.gov.in, Internet: http://www.dte.org.in


ईमलद्वारे / स्मरणपत्र-२ क्रमांक: १६/आस्था/संकीर्ण/२०१९/२८०

अतितात्काळ दिनांक : 24 SEP 2019

प्रति,

१) सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

मुंबई / पुणे / नाशिक / औरंगाबाद / अमरावती / नागपूर.

विषय:-१ जुलै, ते ३० सप्टेंबर, २०१९ या कालावधीमध्ये ३३ कोटी वृक्षारोपण कार्यक्रमाच्या अंमलबजावणीबाबत.

संदर्भ : १) या संचालनलयाचे पत्र क्र.१६/आस्था/संकीर्ण/२०१९/२४३, दि.२४.७.२०१९

२) या संचालनलयाचे पत्र क्र.१६/आस्था/संकीर्ण/२०१९/२८२, दि.१७.९.२०१९

उपरोक्त विषयाबाबत शासनाच्या दिनांक ११.९.२०१९ रोजी या संचालनालयास प्राप्त ई-मेलच्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, तंत्रशिक्षण संचालनालयास ३,५३,००० वृक्षारोपणाचे उद्दिष्टय देण्यात आलेले आहे. तथापि, वनविभागाकडील सद्यस्थितीनुसार आज दिनांक २४.९.२०१९ रोजी एकूण २,९७,८९२ (८४.३९%) एवढेच उद्दिष्टय साध्य झाल्याचे दिसून येत आहे.

सदर प्रकरणी आपणांस कळविण्यात येत की, ३३ कोटी वृक्ष लागवड योजने अंतर्गत संचालनालनालयास देण्यांत आलेले उद्दिष्टय हे ३० सप्टेंबर, २०१९ पर्यंतच्या कालावधीत पूर्ण करणे आवश्यक आहे. तरी आपल्या विभागांतर्गत सर्व संबंधित संस्थांना आपल्या स्तरावरुन निर्देश देण्यांत येवून, वृक्ष लागवडीचा वेग वाढविण्याबाबत सूचित करण्यांत यावे. संचालनालयास शासनामार्फत देण्यांत आलेले वृक्ष लागवडीचे उद्दिष्टय लवकरात लवकर १०० % पूर्ण करणे आवश्यक आहे. संचालनालयास देण्यांत आलेले उद्दीष्ट पूर्ण न झाल्यास संबंधित संस्थांना याबाबत जबाबदार धरण्यांत येईल, याची संबंधित संस्थांना जाणीव करुन देण्यांत यावी.

तरी वरील बाब लक्षात घेवून वृक्षारोपण कार्यक्रम १००% पुर्ण केल्यावर वनविभाग www.mahaforest.gov.in या संकेतस्थळावर वृक्ष लागवडीबाबतची माहिती अपलोड करण्यात यावी. वरील बाबी विचारात घेवून निर्धारित वेळेत वृक्ष लागवडीचे संचालनालयास देण्यांत आलेलेउद्दिष्टय पूर्ण करण्यात यावे.

(प्रमोद नाईक)

सहसंचालक,

तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत: श्री. अमोल उगलमुगले, कक्ष अधिकारी, उच्च व तंत्रशिक्षण, विभाग, मंत्रालय, मुंबई.